# शेळयांमधील आंत्रविषार

प्रा. के. एल. जगताप
विषय विशेषज्ञ
पशू संवर्धन व दुग्धशास्त्र

डॉ. भैय्यासाहेब गायकवाड
विषय विशेषज्ञ
किटकशास्त्र

प्रा. दिप्ती पाटगावकर
विषय विशेषज्ञ

कृषि विज्ञान केंद्र, खामगाव

पावसाळा सुरु झाला कि जिकडे तिकडे हिरवेगार गवत पहावयास मिळते. गवतांनी सर्व परिसर अच्छादला गेल्यासारखा दिसतो. असे हे हिरवेगार गवत शेळ्या या आवडीने खातात. गवत जर जास्त प्रमाणात खाण्यात आल्यास शेळ्यांना आंत्रविषार हा आजार होऊ शकतो. तर हा आजार कशामुळे होतो ते या लेखात पाहू या.

शेळ्यामध्ये हा आजार अतिशय महत्वाचा आजार आहे. वयाच्या एक आठवड्यापासून ते मोठ्या / जास्त वयापर्यंत हा आजार होऊ शकतो. क्लोस्ट्रीडियम परफ्रीन्जेस (प्रकार सी किंवा डी) या जीवाणूमुळे होतो. जनावराच्या आतड्यामध्ये हा जिवाणू कमी प्रमाणात असतो. शेळ्यांनीजर जास्त प्रमाणात गवत खाल्ले किंवा शेळ्यांना उच्च दर्जाची खाद्य खाण्यास दिले तर जिवाणू मोठ्या प्रमाणात तयार होऊन तेथे विष तयार होते. हे विष आतड्याच्या आतून शोषले जाऊन काही तासाच्या आत शेळ्यांचा मृत्यू देखील होतो. यामध्ये मृत्यूचे प्रमाण १० ते ४० टक्क्यापर्यंत आढळते.



### कारणे:

- शेळ्यामध्ये रोग प्रतिकारक शक्ती कमी असल्यास
- जनावरांच्या आहारात अचानकपणे बदल केल्यास
- जनावरांना खाद्याचे / आहाराचे प्रमाण जास्त वाढविल्यास
- पिष्टमय पदार्थ (स्टार्च) व शर्करा नसणारी खाद्य पुरविल्यास
- आतड्यामध्ये जास्त प्रमाणात विष तयार झाल्यास

### लक्षणे:

- करडामध्ये हा आजार होण्याचे प्रमाण जास्त असते.
- करडे दुध पीत नाहीत, खाण्यात लक्ष लागत नाही. ताप येतो.
- सुस्तपणे एकाठिकाणी बसून राहतात.
- तोंडाला फेस येतो, संडास हिरव्या रंगाची पातळ होते.
- हवेत उडया मारून जमिनीवर पडतात.
- प्रादुर्भाव झाल्यापासून १२ तासाच्या आत करडाचा मृत्यू होतो.

### उपचार:

- हा आजारावर कमी कालावधीचा असल्यामुळे यावर कोणताही असा प्रभावी औषधी उपचार नाही.
- आंत्रविषार या आजाराच्या नियंत्रणासाठी लसीकरण करून घ्यावे.
- तीन महिन्यावरील करडास लसीकरण करावे.
- मोठ्या शेळ्यास वर्षभरातून दोन वेळा लसीकरण करणे गरजेचे आहे.

वरील लेख सविस्तरपणे वाचलात तर आपणास या आजाराची लक्षणे, उपाय या विषयी माहिती मिळण्यास मदत होते.

(संपर्क: +९१ )

★ ★ ★

(पान क्रमांक १४ वरून...)

### असे आहेत करटोलीचे औषधी उपयोग:

- अति लाळ सुटणे, मळमळ, ह्दयाचे त्रास यातही करटोली गुणकारी आहे. रक्तरोग, डोळ्यांचे रोग, धावरे या विकारांत करटोलीचा वापर करतात. वाळवलेल्या फळाचे चूर्ण किंवा फांट नाकपुडीत घातल्यास विपुल स्रावासाठी उत्तेजक आहे. कच्चे फळ भाजी म्हणून वापरतात. हे तापातून उठलेल्या रोग्यास पोषक म्हणून देतात.
- करटोलीच्या फळांची भाजी कारल्यासारखीच असून, पावसाळ्याच्या अखेरीस ही भाजी बाजारात काही ठिकाणी येते.
- ही भाजी रुचकर असून, पोट साफ होण्यासाठी, यकृतातून पित्ताचा स्राव नीट होण्यासाठी उपयुक्त आहे. मधुमेहाच्या रुग्णांनी या भाजीचे नियमित सेवन केल्यास रक्तातील साखर कमी होते, त्याचबरोबर लघवीतील शर्कराही नियंत्रित होते. ज्यांच्या मूळव्याधीतून वरचेवर रक्तस्राव होतो; वेदना, ठणका असतो, अशांसाठी ही भाजी अत्यंत हितकारक आहे.
- सर्दी, खोकला, ताप या पावसाळ्यातील विकारांवर करटोलीची भाजी हितावह आहे.
- त्वचारोग होऊ नयेत म्हणून ही भाजी अवश्य खावी.

(उर्वरित पान क्रमांक ३२ वर...)